# आम्ही व आमचे शेजारी

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

**(इ. स. १९६४ मध्ये नवभारतने पं. जवाहरलाल नेहरू विशेषांक प्रसिद्ध केला होता. त्या अंकात पंडितजींच्या चरित्राचे विविध पैलू अनेक मान्यवर लेखकांनी प्रकाशात आणले होते. त्यांच्या गुणदोषांची चर्चा केली होती. नेहरूंच्या मोठेपणाविषयी त्यांच्या अंधानुयायांच्या मनात कशा भलभलत्या अवास्तव कल्पना घर करून राहिल्या होत्या हे श्री. व. भ. कर्णिक यांनी आपल्या लेखात परखडपणे स्पष्ट करून सांगितले आहे. इतर लेखकांनीही लोकमानसातील हा भ्रमाचा फुगा फोडून एक अप्रिय, कटू कर्तव्य पार पाडले. श्री. व. भ. कर्णिक या अंकातील लेखात म्हणतात, ''पं. नेहरूंचे जीवन एकंदरीने उर्जस्वल खरे, पण त्या जीवनामध्ये एक अत्यंत अपेशी असा परिच्छेद होता. भारत आणि चीन यांच्यामधील संबंध आणि त्या संबंधाविषयी त्यांनी बांधलेली धोरणे हाच तो अत्यंत अपेशी असा परिच्छेद''**

**पं. नेहरूंच्या मोठेपणाविषयीच्या भ्रामक कल्पना आजही दोन अडीच तपानंतर बऱ्याच गणांच्या मनात मूळ धरून आहेत. हे डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांच्या प्रस्तुत लेखावरून वाचकांच्या लक्षात येईल.**

**संपादक)**

चीनने फुगा फोडल्यापासून पं. नेहरूंच्या लोकोत्तरपणाबद्दलच्या भारतीय सुशिक्षितांच्या कल्पना बऱ्याच वास्तवाच्या पातळीवर आल्या. चीनचा इंगा दिसल्यावर 'नेहरू जगाचे पुढारी आहेत, आन्तरराष्ट्रीय राजकारण नेहरूंइतके कोणाला समजत नाही'' वगैरे सुभाषिते कोठेही ऐकण्यात आली नाहीत. पण नेहरू आन्तरराष्ट्रीय क्षेत्रात ''चुकले'' असले तरी भारताला त्यांनी ''आधुनिक'' बनविले. भारताचे औद्योगीकरण केले, विज्ञानाला अभूतपूर्व चालना दिली वगैरे ग्रह आजही कायम आहेत. याच ग्रहाबरोबर नेहरूंनी भारतात एकराष्ट्रीयत्व रुजविण्याचा प्रयत्न केला अशीही नेहरूंची प्रतिमा सुशिक्षितांच्या मनात कायम आहे. हे ग्रह व या कल्पना कितपत खऱ्या आहेत हे पहाण्यासाठी १९४७ साली भारताबरोबरच स्वतंत्र झालेल्या आपल्या शेजाऱ्याशी भारताची तुलना करणे उद्बोधक होईल, कारण १९४७ सालापर्यंत हे सारेच देश ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होते. तेव्हा १९४७ साली त्यांची स्थिति काय होती व पं. नेहरूंसारखा नेता न मिळाल्यामुळे त्यांचे काही नुकसान झाले, की आम्हालाही या देशासारखेच लहान लहान नेते मिळाले असते तर बरे झाले असते असे म्हणण्याची आमच्यावर वेळ आली आहे हे त्यावरून कळून येईल.

सर्वात आधी आमच्या भवितव्याची गाठ ज्याच्याशी बांधली आहे त्या पाकिस्तानचा विचार करू. १९४७ साली पाकिस्तान शेष भारतापासून वेगळे झाले तेव्हा त्याच्याजवळ अवघे आठ रणगाडे होते, विमानदळ जवळ जवळ नव्हतेच. पाकिस्तानचे भूदल बरेच लहान होते. एकूण मनात येईल तेव्हा तेव्हा पाकिस्तानला चिरडून टाकता येईल इतका पाकिस्तान दुबळा होता.

राजकीयदृष्ट्या देखील पाकिस्तानी स्थिती भारताच्या मानाने असमाधानकारक होती. पाकिस्तानचे संस्थापक जिना पाकिस्तानच्या स्थापनेपासूनच काम करण्याच्या अवस्थेत राहिले नाहीत व एक वर्षाच्या आतच मृत्यु

### लोकप्रियतेसाठी व्यक्तीत्त्वाचा बळी

याचा अर्थ लोकप्रियता विकत घेण्याकरता नेहरूंना आपले व्यक्तीमत्त्व दडपून टाकावे लागले. ते काही सोपे नव्हते. भोंदूगीरी व लबाडी कठोर नैतिकतेमुळे अशक्य होती. दोन विसंवादी मूल्यांची सांगड घालण्याचा तो प्रयत्न होता. सुशिक्षीत व सुसंस्कृत आधुनीक माणसाच्या बुद्धिनिष्ठेचा व विश्लेषण न केलेल्या अंधश्रद्धेवर आधारलेल्या व्यक्तीनिष्ठेचा तो झगडा होता. या झगड्यात नेहरूंनी स्वत:वर लादलेल्या दुसऱ्या व्यक्तीमत्वाचा विजय झाला. खऱ्या नेहरूंपेक्षा दुसरा नेहरू बलवान ठरला. याचा परिणाम भयंकर झाला. नेहरूंनी स्वत:ला फसवले. त्यांचे व्यक्तीमत्त्व खुरटले गेले. 'यशस्वी' राजकारणी पुरुषांपुढे अत्यंत श्रेष्ठ व सर्जनशील व्यक्तीमत्त्व विलयास गेले.

पावले. त्यानंतर सर्व पाकिस्तानचा विश्वास संपादू शकेल असा नेता पाकिस्तानात नव्हता. पंतप्रधान लियाकत अली यांचा खून झाला व नंतर सैनिक क्रांती झाली. ज. अयुबखान यांच्या काळापर्यंत पाकिस्तानला राजकीय स्थिरता लाभली नाही.

पाकिस्तानात जाणारी जनताही एकत्वाच्या भावनेने बांधलेली नव्हती. बख्तूनावर तर पाकिस्तान लादण्यातच आले होते. ४५ च्या निवडणुकात त्यांनी पाकिस्तानच्या विरूद्ध मत दिले होते. अखण्ड भारत झाले तर अखण्ड भारतात राहू असे पख्तूनांचे म्हणणे होते. पण ब्रिटिशांनी त्यांना स्वतंत्र राहण्याची मुभा ठेवली नाही. भारत नाही तर पाकिस्तानातच रहावे लागेल असे निक्षून सांगितले. त्यामुळे मुसलमान मतदारांना मुसलमानांचे वेगळे राष्ट्र होत असताना अखण्ड भारतातच रहावे असे पटवून देणे काँग्रेस नेत्यांना शक्य झाले नाही. तात्पर्य पाकिस्तानातून फुटून निघू पाहणारा एक मोठा लढवय्यांचा वर्ग पाकिस्तानच्या सिमेवर होता.

सिन्ध प्रांत देखील पाकिस्तानात जाण्यास फारसा उत्सुक नव्हता. अवघ्या पाच वर्षापूर्वी सिंधमध्ये मुस्लिम लीगचा पराभव झालेला होता.

त्या मानाने भारताची राजकीय परिस्थिती चांगली होती. काँग्रेसचे सर्व मोठे पुढारी हयात होते. भारतातल्या कोणत्याही घटकाने अखण्ड भारतात रहाण्याबद्दल नाखुषी दर्शवली नव्हती. स्वातंत्र्याची चळवळ मुख्यत: हिंदूनीच केलेली होती व त्या चळवळीने प्रेरिलेल्या भावनांनी सारा देश भारलेला होता.

आज काय परिस्थिती आहे ? पाकिस्तानची आर्थिक क्षेत्रातील प्रगती नि:संशय भारतापेक्षा अधिक आहे. पाकिस्तानचे दरडोई उत्पादन ३७० डॉलर तर भारताचे २९० डॉलर आहे.

### पाकिस्तानची बहुतेक क्षेत्रात आघाडी

सैनिकिदृष्ट्या दुबळ्या परिस्थितीतही काश्मीरचा बराचसा भाग पाकिस्तानने हडप केला व तो अजूनही त्याच्याकडेच आहे. ६५च्या लढाईत आम्ही पाकिस्तानचा पराभव करू शकलो नाही व हा वांधा सोडविण्यासाठी रशियाची मध्यस्थी मान्य करून आम्हाला ताश्कंदला जावे लागले. ७१च्या लढाईत पाकिस्तानने आमच्याकडून हिसकून घेतलेला छांबचा भाग आम्हाला परत घेता आला नाही. आज पाकिस्तानजवळ नऊ अणुबाँब आहेत असे अमेरिकेचे हेरखाते सांगते. आमच्याजवळ एक देखील अणुबाँब असल्याची या खात्याची माहिती नाही. आज पाकिस्तानचे सैन्यबळ इतके वाढले आहे की उपलब्ध माहितीवरून पहाता पाकिस्तानवर निर्णायक विजय मिळविण्याचे सामर्थ्य आमच्यात नाही.

पाकिस्तान एकसंघ राहू शकले नाही, बांगलादेश पाकिस्तानातून बाहेर पडला, तसा अजून एखादा प्रदेश भारतातून बाहेर पडला नाही. परंतु याचे कारण असे की पाकिस्तान नावाचा देश १९४७च्या पूर्वी कधी नव्हताच. हजारो मैल दूर असलेल्या दोन प्रदेशांचे एक राष्ट्र पूर्वी कधी झाले नाही. ते आताच होईल अशी अपेक्षा करणे बरोबर नाही. उलट भारत हा निदान विष्णुपुराणाच्या काळापासून एक राष्ट्र म्हणून अस्तित्त्वात आहे. निरनिराळ्या काळी निरनिराळ्या प्रदेशात निरनिराळी राज्ये असली तरी साऱ्या राष्ट्रात कायद्याची पद्धती एक, शिक्षणाची संस्कृत भाषा एका व्यापाराच्या दृष्टीने सर्व देशाला बांधणारे सुत्र एक अशी परिस्थिती निदान अडीच हजार वर्षे तरी होती. तेव्हा पाकिस्तानचे राष्ट्र म्हणून टिकणे मुळापासून शंकास्पद होते.

भारताचे राष्ट्रीय दृष्टया आज विभाजन झालेले नसले तरी स्वराज्याच्या उषःकाली भारतात जेवढी एकात्मता होती त्याच्या शतांशही आज नाही. द्रविडिस्तान, खलिस्तान वगैरेच्या चळवळी "स्वराज्यानंतरच" सुरू झाल्या. नागालॅण्ड स्वत:ला भारतापासून पृथक मानते. तेथे सरकारविरूद्ध बंडाळ्या झाल्या. हिंदूमुसलमानांचे दंगे स्वराज्यानंतर कमी होण्याच्या ऐवजी उलट वाढले. नागपुरात १९२७ नंतर हिंदूमुसलमानांचा दंगा झाला नव्हता तो स्वराज्या नंतर पहिल्यांदा झाला.

हिंदूमुसलमानांच्या दंग्यात जोडीला ज्या जातीजमातीत ब्रिटिशकाळात कधीही दंगे झाले नाहीत त्यांच्यात दंगे होउ लागले. सवर्ण-असवर्ण, शीख व शीखेतर हिंदु, मराठी भाषी व गुजराथी भाषी याचप्रमाणे भारतभरच भिन्नभाषीय गट यांच्यात "स्वराज्यात" दंगे झाले ते ब्रिटिशकालात अश्रुतपूर्व होते.

भारतात लोकशाही टिकली, तशी ती पाकिस्तान व ब्रम्हदेशात टिकली नाही याबद्दल भारताने विशिष्ट मर्यादेपर्यंत अभिमान बाळगणे वाजवी आहे. पण कोणत्याही एका व्यक्तीचे हुकुमशाही एकचालकानुवर्तित्व फक्त नेहरू कुटुंबियांनीच पुरविले.

व गुजराथी भाषी यांचप्रमाणे भारतभरच भिन्नभाषीय गट यांच्यात ''स्वराज्यात'' दंगे झाले ते ब्रिटिशकालात अश्रुतपूर्व होते.

भारतात लोकशाही टिकली, तशी ती पाकिस्तान व ब्रम्हदेशात टिकली नाही याबद्दल भारताने विशिष्ट मर्यादेपर्यंत अभिमान बाळगणे वाजवी आहे. पण कोणत्याही एका व्यक्तीचे हुकुमशाही एकचालकानुवर्तित्व फक्त नेहरू कुटुंबियांनीच पुरविले व नेहरू इंदिरा गांधी व राजीव गांधी यांचीच सरकारे पूर्ण काळ टिकू शकली. तात्पर्य भारतात जे टिकले आहे ती लोकशाही नसून एका राजवंशाची लोकशाहीला मुलामा असलेली सत्ता आहे.

आत्ता आपण भारताचा दुसरा शेजारी जो चीन त्याच्याकडे वळू. भारत ''स्वतंत्र'' झाला त्यावेळी चीनमध्ये यादवी माजलेली होती. ती दशकापेक्षा जास्त काळ चाललेली होती. म्हणजे भारतामध्ये ब्रिटिश काळात जेव्हढी अंतर्गत शांतता होती तेवढी चीनमध्ये मुळीच नव्हती. ती १९४९च्या सुमारास स्थापन झाली.

असे असून चीन ही एक जगातली महाशक्ती म्हणून आज पुढे आलेली आहे. चीनने दुसऱ्यांच्या मदतीवर अवलंबून न रहाता अणुबॉम्ब, व उद्जन-हैड्रोजन बॉंब केला आहे, आन्तरराष्ट्रीय पल्ल्याची अस्त्रे केलेली आहेत.

**श्रीलंकेचा स्पृहणीय अभिलेख**

भारताचा तिसरा शेजारी बांगलादेश हा आहे. दुसऱ्या पाकिस्तान युद्धापर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा भाग होता. पाकिस्तानी राज्यकर्ते बंगलादेशाला वसाहतीसारखे वागवीत असत. त्यामुळे बांगलादेशाच्या विकासाचा दोन शतकाच्या वरपर्यंत प्रयत्नच झाला नाही. शिवाय बंगलादेशात एका वर्गमैलात १८०० लोक रहातात, उलट भारतात अवघे ६०० लोक रहातात. साधनांच्या मानाने लोकसंख्येचा एवढा भार असल्यामुळे बंगला देशांचे दरडोई उत्पादन, साक्षरता व आयुर्मान भारतापेक्षा कमी आहे. पण बालमृत्युची संख्या भारतापेक्षा बंगलादेशात कमी आहे. शिवाय बंगलादेशाने आपला लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाचा एक युक्तिशील उपाय शोधून काढला आहे. त्याने भारतातील 'सेक्युलर' लोकांच्या मदतीने आपली जवळ जवळ एक कोटी जनसंख्या भारतात चरण्यास पाठविली आहे. भारतीयांना सगळ्या जगातून लाथा मारून हाकलून देण्यात येते. भारतात मात्र परकीय आरामात येथल्या नागरिकांच्या तोंडची भाकर हिसकून जगत असतात.

भारताच्या शेजारचा चौथा देश श्रीलंका हा आहे. भारताने पाकिस्तानच्या मानाने कमी प्रगती केली कारण पाकिस्तानची लोकसंख्या त्याच्या क्षेत्रफळाच्या मानाने कमी हे असे सांगण्यात येते. त्यामुळे लोकसंख्येची दाटी जेथे भारतापेक्षाही किंचित जास्त आहे त्या श्रीलंकेच्या प्रगतीचा आता विचार करू. श्रीलंकेचे दरडोई उत्पादन ३७० डॉलर आहे. तर भारताचं २९०च आहे. भारताचे सरासरी आयुर्मान ५७ वर्षे आहे तर श्रीलंकेचे ७० आहे. भारताची साक्षरता ३६ टक्के तर श्रीलंकेची ८७ टक्के आहे.

लोकसंख्येचे प्रमाण श्रीलंकेला भारताहून अनुकुल नाही तशीच परिस्थितिही अनुकुल नाही. एका दशकापासून तेथे यादवी सुरू आहे. ही यादवी सुरू ठेवण्यात भारताचाही हात आहे. श्रीलंकेत तामिळभाषीकांची फार मोठी संख्या आहे. श्रीलंकेच्या सरकारने हे ''मुलतः'' भारतीय लोक असल्यामुळे त्यांना परत घ्यावे अशी भारत सरकारकडे मागणी केली. त्यापैकी काही लोकांना परत घेण्याचे श्री लालबहादूर शास्त्रींनी कबूल केले. वस्तुतः श्रीलंकेतले तामिळी मूलतः भारतीय आहेत तसेच सिंहली देखील मूलतः भारतीयच आहेत. तेव्हा शेकडो वर्षांपूर्वी जे लोक भारतातून गेले त्यांना आम्ही परत येऊ असे कबूल करून शास्त्रींनी फारच अनिष्ट प्रवृत्तींना उत्तेजन दिले.

सिंहली मूलतः भारतीय असले तरी भारतात सिंहली

**परस्परविरोधी वर्तन**

शतकानुशतकांच्या सामाजिक अन्यायाचा प्रतिकार व आर्थिक असमानतेविरूद्ध लढा हाच राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा पाया होता. परंतु ही बंडखोरी आंधळी होती. अन्यायाला वाचा फुटण्यास वाव मिळाला असता तर सामाजिक क्रांतीकारक शक्तींनी 'जैसे थे' शक्तींना शह दिला असता. सामाजिक न्यायाकरीता आसुसलेल्या परंतु राजकीय दृष्ट्या मूक अशा चळवळींची नेहरूंच्या राष्ट्रवादाने दिशाभूल केली. छुप्या समाजवादी व डाव्या राष्ट्रवादी गटांच्या साम्राज्यावादविरोधी घोषणा कडव्या वंशवादाची राजकीय नांदी ठरली. मुख्यत्वेकरून ब्रिटिशांचे विरूद्ध असलेली ही चळवळ युरोपीयन उदारमतवादाच्या परंपरेत तयार झालेल्या नेहरूंच्या बुद्धीपेक्षा भावनांवर जास्त विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तिमत्त्व दुभंगले गेले. बुद्धीपेक्षा भावनांवर जास्त विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीचे दुसरे काय होणार ? व म्हणून नेहरूंचे जीवन त्यांच्या चहात्यांनासुद्धा न उलगडणारे कोडे वाटते, ते परस्परविरोधी वर्तनाने भरलेले आहे.

## भगवानाचा शोध

नेहरूंचे समाजवादाचे आकर्षण, विसाव्या शतकातील एकाकी बुद्धिवाद्याचे आकर्षण होते. हे आकर्षण इतके जबरदस्त असते की या ध्येयास ते आपले जीवन अर्पण करू शकले असते. ते माणसाला वैचारीक व कार्यकारी क्षेत्रात उंचावू शकते. पण हे आकर्षण जर नुसते भावनिक असले तर मात्र ढासळणाऱ्या भांडवलशाही संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर त्याचे पर्यवसान 'भगवाना'च्या शोधात होते. नेहरूंना आपला देव गांधीत सापडला, व त्यांनी आपले जीवन त्यांना अर्पण करून टाकले. त्यांच्या अज्ञानाधिष्ठित सनातनी मूल्यांचे जन्मभर समर्थन केले.

भाषी लोकांचा एखादा प्रांत नाही. उलट तामिळी भाषी लोकांचा एक मोठा प्रांत भारतात आहे. या प्रांताने श्रीलंकेतील तामिळांची बाजू घेऊन त्यांच्या घातपाती कार्याला उत्तेजन दिले. त्यामुळे तामिळी वाघांची संघटना निर्माण होऊन तिने आज अक्राळ विक्राळ रूप धारण केले आहे. श्रीलंकेच्या सरकारने तामिळी वाघांचा बंदोबस्त करण्यासाठी भारतीय सैन्याला पाचारण केले, त्यावेळी राजीव गांधींना श्रीलंकेतील तामिळी समस्या सोडविण्यासाठी तेथील सरकारवर काही अटी लादता आल्या असत्या. पण तसे काहीच न करता त्यांनी तामिळी वाघांच्या दमनासाठी ७०,००० फौज पाठवली एकदा फौज पाठवल्यावर नायनाट करण्याचे काम तिला करू द्यायला पाहिजे होते. पण नेहमीप्रमाणे अमुक करू नका तमुक करू नका म्हणून फौजेवर निर्बंध घालण्यात आले. त्यामुळे तामिळी वाघांचा नायनाट तर झाला नाहीच, उलट राजीव गांधींचाच त्यांनी बळी घेऊन भारतात अस्थिरता निर्माण केली. भारतीय सैन्याला आपले कार्य करता येत नाही असे पाहून श्रीलंकेच्या सरकारने त्यांना "चले जाव" असा नामुष्किकारक हुकूम दिला. तेव्हा लंकेतील तामिळविषयक धोरणाने श्रीलंकेची डोकेदुखी वाढली तशीच भारताचीही वाढली.

भारताचा पाचवा शेजारी ज्याला आजकाल म्यानमार म्हणतात तो ब्रम्हदेश हा आहे.

### ब्रम्हदेश व नेपाळ

ब्रम्हदेशात अति लोकसंख्येची समस्या नाही. पण १९४७ मध्ये भारताबरोबर स्वतंत्र झाल्यापासून तेथे अशांतता नांदत आहे. स्वतंत्र ब्रम्हदेश सरकार स्थापन झाल्याबरोबरच भर मंत्रीमंडळाच्या सभेत घुसून मारेकऱ्यांनी ऑंग सान व त्यांच्या सहकाऱ्यांची हत्या केली. त्यानंतर हत्याऱ्यांचे जे सरकार स्थापित झाले त्याच्याविरूद्ध लगेच कम्युनिस्ट व केरेन इत्यादी जमातींनी बण्ड सुरू केले. चीनच्या भूमीवरून कम्युनिस्टांनी हाकललेले कोमिटांग सैनिक देखील उत्तरेकडून ब्रम्हदेशात शिरले. असा धुमाकूळ माजून तो जवळ जवळ आजतागायत चालूच राहिला तरी पण ब्रम्हदेशाने काही बाबतीत भारतापेक्षा अधिक प्रगती केली आहे. ब्रम्हीजनतेचे सरासरी आयुर्मान ६० वर्षाचे म्हणजे भारतापेक्षा तीन वर्षांनी जास्त आहे. तेथील साक्षरतेचे शतमान ७८ आहे. भारताचे अवघे ३६ शतमान या मानाने लज्जावह आहे.

भारताचा सहावा शेजारी नेपाळ हा आहे. हा पहाडी व खडकाळ मुलुख आहे. येथे नैसर्गिक संपत्ती फारशी नाही. त्यामुळे सम्पन्नता व त्याबरोबर येणाऱ्या इतर सुधारणा तेथे असणे मूलत:च कठिण आहे. तेव्हा जगात साक्षरता, दरडोई उत्पादकता, व आयुर्मान यांचे जे प्रमाण आहे त्याच्या पुष्कळच खाली नेपाळचे आहे.

त्यातून भारताने श्रीलंकेसाठी जशा समस्या निर्माण केल्या तशाच नेपाळसाठीही केल्या. नेपाळात राणांचे राज्य होते. त्याच्याविरूद्ध उठाव झाला तेव्हा राणांनी तो दडपून टाकला. पण भारताने आपले सैनिक नेपाळात घुसवले व नेपाळात लोकशाही असली पाहिजे असा राणा राज्यकर्त्यांवर दबाव आणला. भारतीय नेत्यांना पाकिस्तानमध्ये लोकशाहीचा झालेला खून झालेला चालतो. त्याबद्दल त्यांनी कधीही निषेध केला नाही. पण नेपाळमध्ये मात्र लोकशाही असलीच पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. चिमुकल्या नेपाळला हा आग्रह मानावाच लागला व राणांनी तेथील काँग्रेसला सत्तेत सहभागी केले. तेव्हापासून नेपाळात शांती राहू शकली नाही. भारत आपल्यावर गुंडगिरी करीत आहे. हे पाहून नेपाळच्या सहानूभूती चीनकडे वळू लागल्या. नेपाळला तिबेटशी जोडणारा रस्ता चीनने बान्धला व त्या मार्गाने भारताला केव्हाही शह देण्याची व्यवस्था केली.

वरील विवेचनावरून दिसून येईल की भारत चीनपेक्षा सर्व बाबतीत, पाकिस्तानपेक्षा दोन बाबतीत, बांगलादेशापेक्षा एका बाबतीत, श्रीलंकेपेक्षा तीन बाबतीत मागासलेला आहे. शिवाय स्वत:च्या शेजाऱ्याशी संबंध बिघडण्यात व त्यांच्यात नसलेल्या समस्या निर्माण करण्यात भारताची धोरणे कारणीभूत झालेली आहेत. भारतीय जनतेने या शोचनीय प्रकारावर उपाय योजना करण्याचा विचार केला पाहिजे.

**(या लेखातील चौकटीत छापलेला सर्व मजकूर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या लेखातून उद्घृत केला आहे. नवभारत १९६४)**